ll दर्शन ll

सांभाळून; सामावून, घे रे पांडुरंगा आता
सारे फोल बाकी, नाही तुजवीण त्राता ll धृ ll

धान्य वाळविता भक्षी, पाखरांचा थवा
आणि त्यास काय, दुजा मेवा हवा
तैसा भाव मनी, जडो जीव पायी
मीळू दे गा मेवा....... दर्शनाचा ll १ ll

गूळ साखरेचा वास, मुंग्या चालती रांगी
गोडीचा ध्यास, रक्तात त्यांच्या अंगी
तुझा जयघोष जेथे, आम्ही तया मार्गी
देई दर्शन सावळ्या, लाभो सुख स्वर्गी ll २ ll

संसारी व्यवहारी, गुंतला हा जीव
सुटू पाहे तरी, आड संसार हाव
व्याघ्र काळ एकदा, खाईल हा देह
कोकरला जीव, आधार हवा.......चरणाचा ll ३ ll

मिसळीला पायी भाव, जैसा कालविला भात
रिपू सहा करती, टपून चोरून कधी घात
अजाण मी न उमजे, द्वैत अद्वैत भेद
भेदरला जीव, मिटो आत्मा-देह भेद ll ४ ll

सांभाळून; सामावून घे रे, पांडुरंगा आता
सारे फोल बाकी, नाही तुजवीण त्राता ll धृ ll

© सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी
sachin.kulkarni78@gmail.com
www.saarthbodh.com